शिक्षा अंतिम करणे बाबत (श्रीमती अर्चना विठठल
सानप, ग्रामसेवक, ग्रामपंचायत- धामनगांव,ता.पाथर्डी)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३५२/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ-१.या कार्यालयाचे दोषारोप/ ज्ञापन क्र.ग्रापं-३/५४७ /२०२३ दिनांक २४/०७/२०२३
२.या कार्यालयाचे आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२४/२०२४,दिनांक १५/०१/२०२४
(चौकशी अधिकारी नियुक्ती)
३. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/खाचौ/ सी.आर.१८/२०२४, दिनांक- १२/०९/२०२५.
४.या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/२२५७६३७/२०२६ दि.२४/०३/२०२६.
५. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/२८३/ २०२६,दिनांक २४/०४/२०२६ नुसार श्रीम सानप अर्चना विठठल,ग्रामपंचायत अधिकारी यांचा खुलासा दि.१०.०४.२०२६.
६.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२)

संदर्भ क्रमांक १ अन्वुये, श्रीमती अर्चना विठठल सानप,तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत-धामनगांव, ता.पाथर्डी त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्रमांक २ नुसार श्रीमती अर्चना विठठल सानप,तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत-धामनगांव, ता.पाथर्डी यांचे गैरतर्वनाविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये पुढीलप्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. श्रीमती अर्चना विठठल सानप,तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत-धामनगांव, ता.पाथर्डी यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या ०६ दोषारोपांपैकी ०२ आरोप सिध्द झाले नाही,०२ आरोप अंशत: सिध्द झालेले आहेत व ०२ आरोप सिध्द झाले आहेत.

विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्रीमती अर्चना विठठल सानप,तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत- धामनगांव, ता.पाथर्डी यांनी कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. त्यामुळे त्यांना संदर्भ क्र.४ नुसार

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल, अशारितीने ०२ वर्ष रोखणे,ही शिक्षा अंतिम का करण्यात येऊ नये? याबाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास अंतिम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केलेली शिक्षा तुम्हांस मान्य आहे, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ५ अन्वये श्रीमती अर्चना विठठल सानप, तत्कालीन ग्रामसेवक त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला आहे.

श्रीमती अर्चना विठठल सानप, तत्कालीन ग्रामसेवक यांचे खुलाश्याचे अनुषंगाने श्रीमती अर्चना विठठल सानप, तत्कालीन ग्रामसेवक महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही; एक वर्ष थोपविणे, ही शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९२४०६०७५८ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 25-09-2026 14:42:34
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

१. श्रीमती अर्चना विठठल सानप,तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत- धामनगांव, ता.पाथर्डी द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी, जि.अहिल्यानगर.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,पाथर्डी.

२/- सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.